# प्रेस नोट

दि. १२/०९/२०२६

## ''शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व सुंगधीत सुपारीचा साधारण ०१ कोटी १८ लाख रकमेचा मुददेमाल हस्तगत करुन कारवाई केलेबाबत.''

वरिष्ठ पोलीस निरिक्षक,भांडूप पोलीस ठाणे यांनी प्राप्त गोपनिय माहितीच्या आधारे प्रतिबंधित गुटखा व सुगंधित सुपारीच्या वाहतुक व विक्रीच्या माहितीची खातरजमा व कारवाई करण्याकरिता सहाय्यक पोलीस निरिक्षक विनोद लाड व पथक यांना रवाना केले.मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे नमुद पथकाने दि. १२/०९/२०२६ रोजी पहाटे ०४:२५ वा.च्या सुमारास भांडुप पोलीस ठाणे हददीतील महानगरपालिका पार्किंग व्हिलेज रोड,नाहूर याठिकाणी वरील नमुद पथकाने सापळा रचून धाड टाकली असता त्याठिकाणी ०१ कंटेनर,०२ टेम्पो,०१ बोलेरो, ०१ पिकअप अशी ०५ वाहने व एकूण ०९ इसमांना ताब्यात घेण्यात आले होते.

वरीलप्रमाणे मिळून आलेल्या वाहनांमध्ये १)वरानसी आशिक सुगंधित सुपारी २) सुगंधित तंबाखू अशा एकूण २०,२१,१०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित सुगंधित सुपारीचे पदार्थ व वेगवेगळया कंपनीचे ०५ मोटार वाहने (किंमत ९८ लाख) असा एकूण ०१,१८,२१,१००(एक कोटी,अठरा लाख एकविस हजार शंभर रुपये) रुपये किंमतीचा मुददेमाल मिळून आला आहे.

वरीलप्रमाणे मिळून आलेली ०५ वाहने ,०९ इसम आणि वर नमुद वर्णनाचा मुददेमाल ताब्यात घेवून भांडूप पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

सदरची यशस्वी व उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त श्री.मनोजकुमार शर्मा (का व सु), मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री. धनंजय कुलकर्णी (पूर्व प्रादेशिक विभाग),मा.पोलीस उप आयुक्त श्री अभयसिंह देशमुख (पूर्व परिमंडळ -०३), व मा. सहायक पोलीस आयुक्त श्री अजय जोशी (भांडुप विभाग),वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्रीमती सपना क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक विनोद लाड, पोह हिरालाल चरांडे, पोह मुकेश तिरमारे, पोह गणेश सोनवणे, पोशि विकास शिंदे, पोशि विजयकुमार पवार यांनी केलेली आहे.